Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2512S01V13P001

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Dec'25
Issue–XII(I), Volume–XIII

# विकसीत भारत आणि मानवी विकास निर्देशांक एक अभ्यास (HDI)

**प्रा.डॉ.माने डी.एन**
कृष्णा महाविद्यालय रेटरे बु|
शिवनगर , ता.कराड, जि.सातारा
विभाग – अर्थशास्त्र

**गोषवारा :**

देशाचा आर्थिक विकास हा मानवी संसाधनाच्या विकासावर अवलंबून आहे.देशाच्या आर्थिक सामाजिक विकास वेगाने घडवून आणावयाचा असेल तर मावी संसाधनातील गुंतवणूक वाढविली पाहिजे सदर पेपर मध्ये मानवी विकास निर्देशकाला प्राधान्य दिले आहे. देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत मानवी संसाधनाचा विकास हा एक महत्वाचा गाभा आहे. मानवी साधन संपत्तीचा विकास म्हणजे लोकांचे शिक्षण आरोग्य, कौशल्ये आणि क्षमता वाढवून त्यांना सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी सक्षम करणे होय. इमारती रस्ते, कारखाने यासारख्या भौतिक घटकासोबत तंत्रज्ञान, सामाजिक एकता आणि राजकारण यांचाही विकास साधने समाविष्ट आहे. मुख्य उद्दिष्ट म्हणजे लोकांच्या जीवन मानात सुधारणा होते. देशाची प्रगती होऊन विकास साध्य करणे होय. सदर लेखात विकसित भारत होण्यासाठी लोकांच्या कल्याणावर भर दिला पाहिजे आर्थिक कल्याणासाठी त्यांचे क्षमता व कौशल्य वाढविण्यासाठी आरोग्य व शिक्षणाचा दर्जा सुधारण्यावर भर देण्याच्या प्रयत्नावर या लेखात प्रकाश टाकला आहे मानवी मूल्य व लोकांचा सर्वांगीण विकास यावर संशोधनपर या लेखात प्रकाश टाकला आहे. नविन शोध तंत्रज्ञान आधुनिक माहितीचा व दळणवळणाचा विचार करून शाश्वत साधन संपत्तीचा विकास कसा करता येईल. यावर सदर संशोधनपर लेखात प्रकाश टाकला आहे. वरील अनेक मुद्द्यांमध्ये वाढ झाली तरच मानवी निर्देशांक वाढून विकसीत भारत होण्यास वाटचाल करता येईल.

**प्रमुख शब्द (Key Words)- भारत देश विकासाची पाऊले टाकत असतांना मानवी विकास निरदेशांक दरडोई उत्पन्न यात वाढ झाली तर भारताचा विक्कास शक्य आहे.**

**प्रस्तावना :**

भारताची अर्थव्यवस्थाही विकसनशील अर्थव्यवस्था आहे. अविकसीत अशा आर्थिक स्थितीतून भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या अवस्थेकडे वाटचाल करीत आहे प्रत्येक देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये मानवी साधनसंपत्ती अतिशय महत्वपूर्ण असते. मानवी भांडवलाच्या विकासाशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही. त्यामुळे मानवी भांडवलातील गुंतवणूक महत्वपूर्ण असून प्रत्येक देशाने ती वाढविली पाहिजे. देशात्यील नागरिकांचे ज्ञान, कौशल्याचा विकास व त्याचा पर्याप्त वापर करू न शकणारा देश प्रगत होऊ शाक्त नाही. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात मानवी संसाधनाला मौलिक स्थान आहे. त्यामुळे मानवी विकासाचे मोजमाप करणे आवश्यक आहे.मानवी भांडवलाची उत्पादन क्षमता वाढविणे हा विकासाचा हेतू असतो. यासाठी मानवाचे शिक्षण, आरोग्य यावर खर्च वाढविणे गरजेचे असते.

आर्थिक विकासाचे मोजमाप करण्यासाठी मानवी विकास निर्देशांक उपयुक्त असतो. सन १९९० पासून युनो. समितीने (UNDP – United Nations Development Program) आपले मानवी विकास अहवाल प्रसिद्ध करण्यास सुरुवात करून मानवी विकासाचा निर्देशांक विकसीत केला.

- **मानवी साधन संपत्तीचा अर्थ :**

मानवी साधन संपत्ती म्हणजे मानवी प्राण्यांच्या अंगभूत असलेली बौद्धिक, मानसिक शारीरिक कौशल्ये होय व या कौशल्याचा विकास व वाढ करण्याची प्रक्रिया म्हणजेच मानव संसाधनाचा विकास होय.

**खालील व्याख्यावरून मानवी संसाधनाचा अर्थ अधिक स्पष्ट होतो.**

१) प्रा.हर्बिसन यांच्या मते – मानवी साधन संपत्ती ही एखाद्या देशाच्या संपत्तीचा अंतिम आधार असते. भांडवल व निसर्गिक संसाधने निष्क्रिय घटक असतात.परंतु मानवी श्रम / संपत्ती हा उत्पादनाचा सक्रीय घटक असतो.

२) डॉ. मार्शल यांच्या मते – शारीरिक,मानसिक आणि नैतिक आरोग्य आणि सामर्थ्य हा औद्योगिक संपत्तीचा आधार असतो तर या उलट भौतिक संपत्तीचे महत्व हे आहे की ती शहाणपणे वापरल्यास तिच्यामुळे शारीरिक व मानसिक आणि नैतिक अशा मानव जातीच्या विविध आरोग्यात आणि सामर्थ्यात वाढ होते.

देशाची लोकसंख्या जास्त असणे म्हणजे देशात मानवी संसाधन जास्त आहे. असा त्याचा अर्थ होत नाही तर या लोकसंख्येचा दर्जा कसा आहे हे महत्वाचे असते. मानवी संसाधन जास्त असण्याच्या बाबतीत भारताचा जगात चीन नंतर दुसरा क्रमांक आहे. परंतु मानवी संसाधनाच्या दर्जाच्या बाबतीत जगात तिसरा क्रमांक लागतो. भारताच्या दर्जेदार मानव संसाधनाला संपूर्ण जगभर मागणी आहे ती मानवी संसाधन संपत्तीचा दर्जा मुळेच

३) प्रा.जे.के.गालब्रेथ या अमेरिकन अर्थ तज्ञाच्या मते – अमेरिकेतील औद्यओगिक वाढीचा बराच मोठा भाग आज जगाला उपलब्ध आहे, तो अधिक भांडवल गुंतवणूकीमुळे नसून मानवी संपत्तीच्या गुंतवणूकीमुळे सुधारलेल्या माणसांनी घडवून आणलेल्या सुधारणांमुळेच

मानवी प्राण्यात जी कौशल्य सुप्त स्वरूपात विद्यमान अंगभूत असतात त्याना खतपाणी घालून फुलवावे लागते त्या गुणांचा कौशल्याचा विविध अंगांनी विविध मार्गांनी विकास करावा लागतो. त्यालाच मानवी साधन संपत्तीचा विकास असे म्हणतात.

**उद्दिष्टे – सदर संशोधन लेखाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे**

१) मानवी विकास निर्देशांकाची सद्य स्थितीचे स्पष्टीकरण करणे व निर्देशांक वाढविणे.
२) मानवी आरोग्याच्या मानवी विकासासाठी सुविधा वाढविणेबाबत स्पष्टीकरण करणे व मानवी भांडवलाची उत्पादन क्षमता वाढविणे.
३) मानवी विकास वाढविणे व कौशल्य वाढविण्यासाठी सोयी व शिक्षण सुविधामध्ये वाढ करणे.
४) तांत्रिक शिक्षण व आरोग्य यांचा मेळ घालणे व मानवी कल्याणाच्या सुधारणा करणे.
५) जीवनमान उंचावण्यासाठी उच्च शिक्षण, तंत्रज्ञान संशोधन, मानवी जीवनाचा दर्जा सुधारणे.
६) दरडोई उत्पन्न व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवून आणणे
७) रोजगार वाढविणे, शिक्षणावर खर्च वाढविणे यातून समाजाचा आर्थिक विकास करणे.
८) व्यक्तिमत्व आणि विकास वाढीच्या कार्यक्रमावर भर देणे.
९) मानवी विकासाची प्रगती करणे.
१०) मानवी विकास निर्देशांकाची सद्य स्थिती समजावून घेणे.

मानव विकास निर्देशांकात अपेक्षित आयुर्मयादा निर्देशांक, शैक्षणिक प्राप्ती निर्देशांक आणि समायोजन वास्तव GDP दरडोई (PPP) उत्पन्न निर्देशांक यांची साधी सरासरी म्हणजे मानवी विकास निर्देशांक होय.

अलीकडील काळात विकासाशी संबंधीत अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक वाढीकडून मानवी विकासाकडे लक्ष्य वेधले आहे. मानवी विकास हा सर्व कार्यक्रमाचा शेवट आहे त्यांचेमापन हे सोपे काम नाही. यासाठी व्यक्तींचा सर्वांगीण विकास व आर्थिक कल्याण साधत असताना दरडोई उत्पन्न वाढले पाहिजे. शैक्षणिक कौशल्य गुणवत्ता आणि क्षमता वाढविली पाहिजे तेव्हा असे मापन करण्यास सोपे होते मानवी विकासाचे मापन होण्यासाठी मानवी विकासाचे अहवाल सातत्याने मार्गदर्शन करणारे प्रसिद्ध केले पाहिजेत.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2512S01V13P001
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Dec'25
Issue–XII(I), Volume–XIII

**माहिती संकलन** – सदर संशोधनपर लेखातील माहिती ही दुय्यम तथ्यावर आधारीत आहे. यासाठी संदर्भ ग्रंथ मासिके दैनिक पेपर, निर्देशांक अहवाल – इंटरनेटवरील प्रसिद्ध विकिपीडिया या वेब साईटवरील प्रसिद्ध झालेले संशोधनपर लेखातील माहितीवर आधारीत सदर संशोधनपर लेख आहे.

**गृहीतके** –

१)मानवी विकास निर्देशांक लोकसंख्येच्या आधारावर काढला जातो.

२)लोकसंख्या वाढत जाणारी आहे.

३)लोकसंख्या व आर्थिक विकास यांचा निकटचा संबंध आहे.

४)दरडोई उत्पन्नावरून लोकांचे आभिके कल्याण समजते.

ज्या देशाचा मानवी विकास निर्देशांक जास्त त्या देशाचा विकास झाला आहे. असे समजले जाते ज्या देशाच्या मानवी विकास निर्देशांकाचे मूल्य ०.५ च्या खाली असते अशा देशातील मानवी विकासाची पातळी अल्प असते. ज्या देशांचे मूल्य ०.५ ते ०.८ यामध्ये असते ते मध्यम पातळीवर असतात. ज्या देशांचे मुल्य ०.५ ते ०.८ या मध्ये असते ते मध्यम पातळीवर असतात. ज्या देशांचे मूल्य ०.८ पेक्षा अधिक असते. ते उच्च पातळीवर असतात. मानवी निर्देशांक तयार करताना दीर्घायुष्य, ज्ञान व जीवनमान हे तीन प्रमुख निर्देशक मिळून तयार केला जातो. भारताचा मानवी विकास मूल्य हे मध्यम पातळीवर आहे. म्हणजेच ते ०.५ ते ०.८ या मध्ये मध्यम पातळीवर असल्याचे दिसते.

**मानवी विकास निर्देशांकाचे मापन** – मानवी विकास निर्देशांक मापन करण्याची तीन मुलभूत दर्शक आहेत. ते पुढीलप्रमाणे

१)दीर्घायुष्य – (Longvity) यामध्ये दिर्घ व आरोग्यदायी जीवनाचे मापन असते जे जन्माच्या अपेक्षीत आयुर्मयादेने केले जाते.

२)शैक्षणिक प्रगती (Educational Attainment) याचे मापन प्रौढ साक्षरता आणि प्राथमिक, द्वितीय व तृतीय स्तरावरील एकत्रित स्थूल नाव नोंदणी प्रमाण यांच्या एकत्रिकरणाने होते.

३) राहणीमान – योग्य राहणीमानाचे मापन स्थूल देशांतर्गत दरडोई उत्पन्न जे डॉलरच्या संदर्भात खरेदीशक्ती क्षमता यावर आधारीत असते.

मानवी विकास निर्देशांकाची गणना करण्यापूर्वी या तीन निर्माण केलेल्या परिमाणांचा प्रत्येकाचा निर्देशांक तयार करावा लागतो. प्रत्येक मापनाचे कार्याचे मूल्य ० ते १ दरम्यान व्यक्त केले जाते. त्यासाठी पुढील सूत्राचा अवलंब केला जातो

$$\text{परिमाण निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य – किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य – किमान मूल्य}}$$

**मानवी विकास निर्देशांक आणि भारत** – भारत देश मानवी विकास निर्देशांक पातळीच्या मध्यमश्रेणीत असल्याचे दिसते. आयुर्मान वाढले असले तरी जोपर्यत आरोग्य सेवा आणि उत्पन्न पातळीत सुधारणा होत नाही तो पर्यंत गरीबी असमानता आणि बेरोजगारी या समस्या असतात तो पर्यंत भारताची श्रेणी बदलणार नाही त्यामुळे दारिद्रय, बेकारी यावर अचुक उपाय योजने गरजेचे आहे.

आज भारतात सकारात्मक वाढ असल्याचे दिसते यावरून असे दिसते की मानवी विकास निर्देशांक (HDI) मूल्य २०२२ मधील ०.६७६ वरून २०२३ मध्ये ०.६८५ पर्यंत वाढल्याचे दिसते. मागील वर्षाच्या तुलनेत भारताने मानवी विकास निर्देशांक मूल्यात वाढ केल्याचे दिसते,२०२२ मध्ये १९३ देशांपैकी भारत देशाचा यामध्ये क्रमांक १३३ होता तो २०२३ मध्ये १३० व्या क्रमांकावर झेप घेतल्याचे दिसते.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2512S01V13P001

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Dec'25
Issue–XII(I), Volume–XIII

**प्रगती** – २०२१ मध्ये भारताचा मानवी विकास निर्देशांक मूल्य ०.६३३ होता तो २०२२ मध्ये ०.६७६ तर २०२३ मध्ये ०.६८५ पर्यंत पोहोचला आहे. आव्हानात्मक परिस्थिती म्हणजे जागतिक सरासरी मानवी निर्देशांक मूल्य ०.७३९ आहे त्यामुळे ०.६८५ असलेले भारताचे मूल्य आजूनही जागतिक सरासरी मुल्यांपेक्षा कमी आहे हे दिसते. सदर मूल्यात वाढ करण्यासाठी भारताने आरोग्य, शिक्षण व जीवनमान उंचविण्यासाठी अन्न धान्यामध्ये स्वयंपूर्णता गाठली पाहिजे.शिक्षण क्षेत्रातील कौशल्यपूर्ण शिक्षणासाठी खर्चात वाढ केली पाहिजे. दरडोई उत्पन्न वाढविण्यावर भर दिला पाहिजे. लोकांचे जीवनमान उंचविण्यासाठी सुधारणा केल्या पाहिजेत.

**संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमानुसार भारत देशाचा मानवी विकास निर्देशांक HDI खालीलप्रमाणे**

| **सन/वर्ष** | **मानवी विकास निर्देशांक (HDI)** |
|---|---|
| 1990 | 0.434 |
| 2000 | 0.490 |
| 2010 | 0.572 |
| 2022 | 0.676 |
| 2023 | 0.685 |

Source - https://en-rw-wikippdia-org.translate.goog/wiki/lis

**सन २०२२ संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम अहवालानुसार :-**

- मानवी विकास निर्देशांक – 0.644
- आरोग्य विकास निर्देशांक – 0.735
- शालेय वर्ष – एकूण-12.58,स्त्री-12.61,पुरुष-12.56
- सरासरी शालेय वर्षे – 6.571,स्त्री-5.529,पुरुष-7.626
- दरडोई आणि राष्ट्रीय उत्पन्न,एकूण – 8.847, स्त्री 7.992, पुरुष 9.278
- शैक्षणिक विकास निर्देशांक – 0.569
- उत्पन्न निर्देशांक – 0.641
- आयुर्मान निर्देशांक – 67.74, स्त्री 69.38, पुरुष 66.26

सन २०२३ मध्ये भारताचा मानवी विकास निर्देशांक ०.६८५ च्या वर पोहचला आहे म्हणजे भारत देश मध्यम श्रेणीत आहे असे म्हणता येईल. भारतातील विविध राज्यांपैकी केंद्र शासीत प्रदेशामध्ये मानव विकास निर्देशांकात लक्षणीय फरक आहे. भारतातील राज्यामध्ये गोवा राज्याचा मानवी विकास निर्देशांक अधिक आहे तर बिहार राज्य हे सर्वात कमी मानवी विकास निर्देशांक असलेले राज्य आहे. असे म्हणता येईल.

मानवी विकास निर्देशांक व ही मानवी विकासाच्या प्रमुख आयामामधील सरसरी कामगिरीचा सारांश आहे. दिर्घ आणि निरोगी आयुष्य ज्ञानी असणे आणि योग्य राहणीमान असणे आवश्यक असते. आरोग्याचे परिणाम –जन्माच्या वेळी आयुर्मानानुसार मोजले जाते. शिक्षणाचे परिणाम - जन्माच्या वेळी आर्युमानानुसार मोजले जाते. शिक्षणाचे परिणाम २५ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या प्रौढांसाठी सरासरी शिक्षणाच्या वर्षावरून मोजले जाते.शाळेत प्रवेश करणाऱ्या मुलांसाठी अपेक्षित शिक्षणाच्या वर्षापासून मोजले जाते. राहणीमानाचा दर्जा दरडोई व राष्ट्रीय उत्पन्नावर मोजला जातो.

उदा. २०२२ गोवा – ०.७६०

बिहार – ०.५७७

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2512S01V13P001
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Dec'25
Issue–XII(I), Volume–XIII

**मानव विकास रिपोर्ट (HDR) २०२३ नुसार**

| रँक | देश | मा .निर्देशांक |
|---|---|---|
| १ | आईलँड | ०.९७२ |
| २ | नॉर्वे | ०.९७० |
| ३ | स्वीझरलँड | ०.९७० |
| ४ | डेन्मार्क | ०.९६२ |
| ५ | जर्मनी | ०.९५९ |
| ६ | स्वीडन | ०.९५९ |
| ७ | ऑस्ट्रेलिया | ०.९५८ |
| ८ | हॉन्गकॉन्ग | ०.९५५ |
| ९ | नेदरलँड | ०.९५५ |
| १७ | संयुक्त राज्य | ०.९३८ |
| | अमेरिका | |
| १३० | भारत | ०.६८५ |

Source - **htts://www.drishtiias.com/gubdu-odates/daily.news/analysis-d**

मानवी विकास निर्देशांकाचा वापर राष्ट्रीय धोरणाच्या आवडीनिवडीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासाठी केला जाऊ शकतो ज्यामध्ये दरडोई जी.एन.आय समान पातळी असलेल्या दोन देशाचे वेगवेगळ्या मानवी विकासाचे परिणाम कसे मिळतील हे पाहता येते.

उदा. २०२२ गोवा – ०.७६०

बिहार – ०.५७७

**जगातील काही निवडक देशांच्या दरडोई उत्पन्नाची तुलना**

| रँक | देश | दरडोई उत्पन्न |
|---|---|---|
| १ | यू.एस.ए. | ५५,२०० |
| २ | चीन | ७,३८० |
| ३ | जपान | ४२,००० |
| ४ | भारत | १,५७० |
| ५ | जर्मनी | ४७,६४० |
| ६ | यू.के. | ४२,६९० |
| ७ | फ्रान्स | ४३,०७० |
| ८ | इटली | ३४,२८० |
| ९ | रशिया | १३,२१० |
| १० | कॅनडा | ५१,६९० |
| ११ | मेक्सिको | ९,८६० |

Source - वरील तक्त्यामधील मानवी विकास निर्देशांक : आंतरराष्ट्रीय तुलना (HDI – International Comparison)

वरील तक्त्यानुसार जगातील काही निवडक देशांचे यू.एस, डॉलरमध्ये दरडोई उत्पन्न दर्शविले आहे. विविध देशांशी तुलना करता भारताचे दरडोई उत्पन्न कमी आढळते.एवढेच नव्हे तर अल्प विकसित अर्थव्यवस्था असणाऱ्या देशांच्या तुलनेनेसुद्धा भारताचे दरडोई उत्पन्न अल्प आहे.

मानवी विकास निर्देशांकाचे आंतरराष्ट्रीय तुलना

निवडक देशांचा (सन १९९० ते २०१४ ) मानवी विकास निर्देशांक कल

| मानवी विकास निर्देशांक<br>स्थान व देश | १९९० | २००० | २०११ | २०१३ | २०१४ |
|---|---|---|---|---|---|
| अति उच्च मानवी विकास – ४९ | | | | | |
| १. नॉर्वे – १<br>२. ऑस्ट्रेलिया – २<br>३. स्वित्झर्लंड – ३<br>४. डेन्मार्क – ४<br>५. नेदरलँड – ५ | ०.८४९<br>०.८६५<br>०.८३१<br>०.७९९<br>०.८२९ | ०.९१७<br>०.८९८<br>०.८८८<br>०.८६२<br>०.८७७ | ०.९४१<br>०.९३०<br>०.९२५<br>०.९२०<br>०.९११ | ०.९४२<br>०.९३३<br>०.९२८<br>०.९२३<br>०.९२२ | ०.९४४<br>०.९३५<br>०.९३०<br>०.९२३<br>०.९२२ |
| उच्च मानवी विकास – ५६ | | | | | |
| १. रोमानिया – ५३<br>२. उरुग्वे – ५४<br>३. कझाकस्तान – ५५<br>४. बोरबोडस – ५६<br>५. पनामा – ६० | ०.७०३<br>०.६९२<br>०.६९०<br>०.७१६<br>०.६५६ | ०.७०६<br>०.७४२<br>०.६७९<br>०.७५३<br>०.७१४ | ०.७८६<br>०.७८४<br>०.७७२<br>०.७८६<br>०.८५९ | ०.७९१<br>०.७९६<br>०.७८५<br>०.७८५<br>०.७७७ | ०.७९३<br>०.७९३<br>०.७८८<br>०.७८५<br>०.७८० |
| मध्यम मानवी विकास – ३९ | | | | | |
| १. इजिप्त – १०८<br>२. इंडोनेशिया – ११०<br>३. दक्षिण आफ्रिका – ११७<br>४. भारत – १३१<br>५. कम्बोडिया – १४४ | ०.५४६<br>०.५३१<br>०.६२१<br>०.४२८<br>०.३६४ | ०.६२२<br>०.६०६<br>०.६३२<br>०.४९६<br>०.४१९ | ०.६८२<br>०.६७१<br>०.६५७<br>०.५९७<br>०.५४१ | ०.६८९<br>०.६८१<br>०.६६३<br>०.६०४<br>०.५५० | ०.६९०<br>०.६८४<br>०.६६६<br>०.६०९<br>०.५५५ |
| अल्प मानवी विकास – ४४ | | | | | |
| १. पाकिस्तान – १४७<br>२. नायजर – १८८ | ०.३९९<br>०.२१४ | ०.४४४<br>०.२५७ | ०.५२७<br>०.३३३ | ०.५३६<br>०.३४५ | ०.५३८<br>०.३४८ |

Source - मानवी विकास अहवाल (२०१४)

वरील मागील पत्रकावरून आपणास पुढील तुलनात्मक बाबी स्पष्ट होतात.

https://doi.org/10.69758/GIMRJ/2512S01V13P001
e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Dec'25
Issue–XII(I), Volume–XIII

जगातील १८८ देशांचे मानवी विकास निर्देशांक संग्रहित केले आहेत.परंतु या सर्वांचे विश्लेषण करणे कठीण असल्याने आपण सोईसाठी निवडक देशांचेच मानवी विकास निर्देशांक दिले आहेत. यांपैकी ४९ देश अति उच्च मानवी विकास टप्प्यात आहेत. ५६ देश उच्च मानवी विकास टप्प्यात आहेत.आणि ४४ देश अल्प/कमी मानवी विकास टप्प्यात आहेत.

वरील पत्रकात प्रत्येक देशाचे स्थान मानवी विकास निर्देशांकानुसार दर्शविले आहे.नार्वेचे स्थान-१,डेन्मार्क-४, पनामा-६०,भारत-१३१,पाकिस्तान-१४७ इत्यादी.

वरील पत्रकात आपण २४ वर्षांचा (सन १९९० ते २०१४ )निवडक देशांचा मानवी विकास निर्देशांक कल मांडला आहे.यावरून असे स्पष्ट होते,सर्व देश आपला मानवी विकास निर्देशांक सुधारण्याचा प्रयत्न करीत आहेत.

मानवी विकास निर्देशांकात सर्वात शेवटचे स्थान नायजर देशाचे १८८ इतके आहे तर प्रथम स्थानावर नॉर्वे हा देश आहे.

१८८ देशांमध्ये भारताचा मानवी विकास निर्देशांकात १३१ वा क्रमांक असून भारताचा मानव विकास निर्देशांक ०.६०९ इतका आहे.

**निष्कर्ष :**

१)शिक्षणाची उपलब्धता व गुणवत्ता वाढविली पाहिजे
२)शिक्षणाच्या पायाभूत सुविधामध्ये गुंतवणूक करणे
३)व्यवसायिक प्रशिक्षणाला प्रोत्साहन देणे
४)साक्षरता दर व कौशल्य विकासात सुधारणा करणे
५)अधिक शिक्षित कार्यबल निर्माण करणे
६)सार्वजनिक आरोग्य खर्चात वाढ करणे
७)आरोग्य सेवामध्ये प्रवेश सुनिश्चित करून प्रतिबंधात्मक आरोग्य सेवेला प्रोत्साहन देणे
८)आरोग्य सेवा मजबूत करणे
९)कुपोषण माता आणि बाल आरोग्य आणि संसर्गजन्य रोगावर उपचार करणे
१०)ग्रामीण भागात वाडया वस्त्यांमध्ये आरोग्य सेवा केंद्र स्थापन करणे
११)दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे
१२)रोजगार संधी वाढविणे, लोकांना पूर्ण रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक उपक्रम हाती घेणे
१३)लहान उद्योगांना प्रेरणा देणे त्यांना कर्जपुरवठा करणे
१४)राष्ट्रीय उत्पन्न वाढविणेसाठी प्रयत्न करणे
१५)GDP स्थूल देशांतर्गत उत्पादन व निव्वळ राष्ट्रीय उत्पादन (NNP) वाढविणे
१६)मानवी विकास निर्देशकांचे (HDI) चे तीनच दर्शक नाहीत तर बालमृत्यू, पौष्टिकता इतर ही महत्वाचे आहेत
१७)जगातील काही निवडक देशांशी तुलना केली असता भारताचे राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न व मानवी विकास निर्देशांक खूपच कमी आहे. त्यामध्ये वाढ करण्यासाठी भारताला विविध स्तरांवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.
१८)सारांश – सदर प्रकरणामध्ये जगातील भारतासह निवडक देशांचे राष्ट्रीय उत्पन्न,दरडोई उत्पन्न व मानवी विकास निर्देशांकाची तुलना केली आहे. जगातील काही निवडक देशांशी भारताची तुलना केली असता भारताचे राष्ट्रीय उत्पन्न,दरडोई उत्पन्न व मानवी विकास निर्देशांक खूपच कमी आहे. त्यामध्ये वाढ करण्यासाठी भारताला विविध स्तरांवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1) https://askfilo.com
2) https://wwwdirshtiias.com
3) https://hdr.undp.org
4) https://marathi.indiatimes.com
5) https://testbook.com
6) https://hdr.undp.org
7) भारतीय अर्थव्यवस्था एक दृष्टीक्षेप
प्रा.डी.आर.जगताप
प्रा.डॉ.नीता वाणी
प्रा.डॉ.मंगला जंगले
प्रा.डी.जी.पाटील
8)https://en-m-wikipedia-org.translate.goog/wiki/lis.
9)https://www.drishtriias.com/hindi-vpdates/daily/news/analysis-d
10)Globalistaion & farmers, Industries, Co-Operatives, Banks in India
- Dr. V.V.Ghanekar
11)कृषी अर्थशास्त्र – डॉ.कविमंडन
12)मानवी विकास अहवाल – २०१४
13)World Bank, World Development Indicators (2015)